॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ ( गोपनीय उत्तरार्ध )**

जा. क्र. कबचौउमवि/७-आय/1432/२०२४ दिनांक : १६ /०४ /२०२४

**प्रती,**
**मा. प्राचार्य / संचालक**
कबचौउमविशी संलग्नित सर्व महाविद्यालये आणि
मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था.

**विषय : विद्यापीठामार्फत आयोजित केलेल्या उन्हाळी परीक्षा - २०२४ कामकाजाबाबत..**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मधील उन्हाळी परीक्षा - २०२४ (एप्रिल / मे, २०२४) चे आयोजन करण्यात आले आहे. दि. ०५ एप्रिल, २०२४ पासून विद्यापीठाअंतर्गत येणा-या सर्व संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या विविध अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षा सुरू झालेल्या आहेत. दि. ०५ एप्रिल, २०२४ ते दि. १३ एप्रिल, २०२४ या कालावधीत संपलेल्या लेखी परीक्षांच्या उत्तरपत्रिका संकलित करण्यात आलेल्या आहेत. सदर परीक्षेच्या कामकाजात मा. प्राचार्य, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाचे सहकार्य होत असून, विद्यापीठाच्या परीक्षांचे कामकाज सुरळीतपणे सुरू आहे. मा. कुलगुरू महोदय वेळोवेळी विविध परीक्षा केंद्रांवर प्रत्यक्ष भेटी देऊन परीक्षेच्या कामाचा आढावा घेत आहेत.

त्या अनुषंगाने आपणांस विनंती की, दि. २० एप्रिल, २०२४ पासून Onscreen Digital Evaluation System अंतर्गत मूल्यांकन केंद्र ( Evaluation Centre ) असलेल्या महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन पद्धतीने उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज कार्यान्वित करण्यात येणार आहे. सदरच्या कामकाजाचे स्वरुप हे कालमर्यादेचे आहे. त्यामुळे आपल्या (मा. प्राचार्य / संचालक) अधिनस्थ ज्या शिक्षकांची नेमणूक ऑनलाईन उत्तरपत्रिका मूल्यांकनाकरिता करण्यात आलेली आहे त्यांनी सदर मूल्यांकनाचे कामकाज प्राधान्याने पूर्ण करून विद्यापीठास सहकार्य करावे.

आपला विश्वासू,

**( प्रा. योगेश ना. पाटील )**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
**कबचौउमवि, जळगाव**

प्रत माहितीस्तव सादर..
परीक्षा समन्वयक, मुल्यांकन केंद्र (Evaluation Centre)

E\kso\VERIFICATION_TIPAN_2022